**E-AUCTION SALE NOTICE**
**FOR SALE OF RNP MARKETING AND CARGO PRIVATE LIMITED**
(In Liquidation) (CIN: U01100MH2008PTC187995)
Room No. F-203, Nandanvan Apts., Dahanukar Wadi, New Link Road, Opp. Lalji Pada Police Station, Kandivali West, Mumbai -400067, Maharashtra, India.
(**Sale under Insolvency and Bankruptcy Code, 2016**)

Notice is hereby given to public in general that the undersigned Liquidator of RNP Marketing and Cargo Private Limited (**RNP/Corporate Debtor**), *in Liquidation*, appointed by the Hon'ble National Company Law Tribunal, Mumbai, Court-I (**Adjudicating Authority/NCLT**) *vide* order dated 11.10.2023 (**Liquidation Order**) intends to sell the Corporate Debtor –

(A) by way of Sale of assets–Immovable Property of the Corporate Debtor forming part of the liquidation estate of Corporate Debtor; and/or

under the Insolvency and Bankruptcy Board of India (Liquidation Process) Regulations, 2016 (**Liquidation Regulations**), through e-auction on "**as is where is basis**", "**as is what is basis**", "**whatever there is basis**" and "**without recourse basis**". The details regarding the Corporate Debtor are available on https://eauctions.co.in Email ID: admin@eauctions.co.in Mobile No. +91 9870099713

| | |
|---|---|
| Auction Date and time | **26-04-2024**<br>**For Block A** - 10:00AM to 12:00 PM with unlimited extension of 5 minutes each.<br>**sale of assets in parcels** |
| Last date for submission of Tender Documents/bid | **10-04-2024** |
| Last date of declaration of Qualified Bidder | **15-04-2024** |
| Last date of information sharing and site visit | **22-04-2024** |
| Last date for submission of Earnest Money Deposit (EMD) | **24-04-2024** |

The reserve price and earnest money deposit will be as mentioned in the table below:

| **Block no.** | **Description of Assets** | **Reserve Price** | **EMD** | **Bid Incremental Value** |
|---|---|---|---|---|
| **A** | **Sale of assets in Parcels – Immovable Property,** as per Regulation 32(d) of the IBBI Liquidation Process Regulation 2016. | | | |
| | Non-Agricultural Land Survey No. 9,11,30/2 and 32/02 at Village Shirsatwadi, Near MNS Office, Taluka Shirala, District Sangli -415405, Total Area in Sq. Mtrs. 91960 | **2,25,00,000** | **10%** | **5,00,000** |

Please note that the e-Auctions would be conducted on **26-04-2024** for RNP Marketing and Cargo Private Limited (In Liquidation). **Option A** the auction for sale of Immovable Property of the Corporate Debtor.

Sale will be done by the undersigned through e-Auction service provider i.e., Linkstar Infosys Private Limited. The sale shall be subject to the terms and conditions prescribed in the Process Memorandum available on https://eauctions.co.in and the following conditions:

1. The particulars of the Corporate Debtor specified in the table above have been stated as per best knowledge.
2. Information available with the Liquidator on *bona fide* basis. It is clarified that the Liquidator makes no representation regarding the accuracy of the status of the details.
3. The prospective bidders are also advised to make their own independent inquiries regarding the Corporate Debtor.
4. The liabilities of the Corporate Debtor shall be settled in accordance with Section 53 of the Insolvency and Bankruptcy Code, 2016.
5. If any offer is received within the last 5 (five) minutes of closure time, the bidding time will be extended automatically by another 5 (five) minutes, the auction will automatically get closed at the extended 5 (five) minutes.

**Jitender Kothari**
**Liquidator of RNP Marketing and Cargo Private Limited**
(Appointed as per the Hon'ble NCLT Mumbai Bench -I, Order dated 11th October 2023, Copy of Order made available on 18th October 2023)
IBBI/IPA-001/IP-P00540/2017-2018/10965
AFA: AA1/10965/02/040924/105985 valid upto 04/09/2024
Reg. Address with IBBI: 702, Orchid A Wing, Evershine Park CHS,
Off Veera Desai Road, Andheri West, Mumbai - 400053, Maharashtra
Reg. Email ID with IBBI: jitenderkothari@rediffmail.com
Project Specific Email ID for Correspondence: liquidator.rnp@gmail.com

Date: 27th March 2024
Place: Mumbai

# CORPORATE BRIEFS



## UPDATE (HPCL)

### HPCL Brings Eye Care to Rural Communities with Mobile Clinic Donation

Hindustan Petroleum Corporation Limited (HPCL), a leading Indian energy company, is making a significant contribution to rural healthcare. They recently donated a fully equipped mobile eye clinic van to the Rural Hospital in Bhadgaon, Jalgaon District, Maharashtra. This initiative aligns with HPCL's commitment to Corporate Social Responsibility (CSR) and aims to address the critical need for accessible and quality eye care services in rural areas. This mobile clinic will bring essential eye check-ups directly to villagers in Bhadgaon Taluka. This will help prevent avoidable blindness and promote early detection of eye problems. The state-of-the-art mobile van is equipped with advanced ophthalmic equipment. Trained personnel will staff the clinic, offering preliminary eye examinations, prescribing corrective lenses, and raising awareness about the importance of regular eye care. This initiative is expected to benefit a large population residing in the 59 villages and 1 town of Bhadgaon taluka. "We are incredibly grateful to HPCL for this generous donation," said Shri Jadav.



## UPDATE (KLE LAW COLLEGE)

### KLE College of Law, Navi Mumbai valedicts 5th National Law Fest SPARKLE 5.0 in grandest way

SPARKLE 5.0 hosted by KLE Society's KLE College of Law in Navi Mumbai showcased the finest talents in the realm of law through its National Moot Court Competition and National Client Counselling Competition. The event's second stage, consisting of the Quarter Final, Semi-final and Final rounds, witnessed rigorous legal arguments and strategic advocacy from participating teams. The distinguished panel of judges for the Finals, including Honorable Justice N.R. Borkar from the High Court of Bombay, Prof. Dr. Venkatarao, Vice-Chancellor of IIULER Goa and Hon'ble Justice A.K. Menon, retired judge High Court of Bombay, ensured an in-depth evaluation process. The valedictory ceremony, graced by Honorable Justice Prasanna B Varle from the Supreme Court of India added immense prestige to the event. It was a moment of celebration and acknowledgment of the hard work, dedication, and talent displayed by all participants. The winners of the National Moot Court Competition were from NMIMS Hyderabad, with the runners-up being from Christ (Deemed to be University) Lavasa. In the Client Counselling Competition, GLC Mumbai emerged as winners, followed by University Institute of Legal Studies, Panjab University, Chandigarh, as the runner-up.



## UPDATE (WR)

### President WRWWO felicitated 46 women employees for their outstanding contribution

Smt. Kshama Misra, President, Western Railway Women Welfare Organization (WRWWO) felicitated 46 Inspiring Women of Western Railway at a function on the occasion of International Women's Day. According to a press release issued by Shri Sumit Thakur, Chief Public Relations Officer of Western Railway, 46 Women Railway Employees of WR were awarded for their outstanding contribution with Merit Certificate and Cash Award. Smt. Kshama Mishra praised the work of all the award winning women and described them as role models for other women railway employees. Shri Thakur added that, WRWWO is always in the forefront to assist railway employees and their families. With this objective, President WRWWO Smt. Misra donated ? 1,00,000 (One Lakh Rupees) to Western Railway's Jagjivan Ram Hospital, Mumbai Central for purchase of useful medical equipment to enhance patient care services to railway beneficiaries.



## UPDATE (WR)

### WR Jagjivan Ram Hospital organized Indian Railway cardiology conference

Western Railway's Jagjivan Ram Railway Hospital, Mumbai Central had recently organized the prestigious annual conference (JRHCON 2024). The conference was inaugurated by Dr. Sugandha Raha, Director General of Railway Health Services, Railway Board, the Chief Guest and Shri Ashok Kumar Misra, General Manager of Western Railway, the Guest of Honour. According to a press release issued by Shri Sumit Thakur – Chief Public Relations Officer of Western Railway, the annual conference was based on the theme 'PREVENTION TO INTERVENTION IN CARDIOLOGY: A WAY FORWARD' and was aptly planned looking at the present clinical situation of cardiovascular diseases in the society at large. The conference was well attended by senior doctors of different zonal railways and was aimed to provide a professional platform for sharing knowledge, fostering collaborative discussions, and promoting advances in preventive and interventional cardiology. A souvenir was also released by Dr. Raha & Shri Mishra on this occasion. DG /RHS as well GM /WR both appreciated the outstanding performance of JRH and congratulated the committed medical team on becoming the first Railway Hospital in Indian Railway to have been awarded with 'NABH accreditation.' The conference was meticulously executed under the able guidance of Dr. Hafeezunnisa, Principal Chief Medical Director of Western Railway, Dr. Mamta Sharma, Medical Director of Jagjivanram Railway Hospital.



## UPDATE (Irish Presidential Award)

### Sinéad El Sibai Receives the Irish Presidential Distinguished Service Award

Dubai Duty Free's Senior Vice President for Marketing, Sinéad El Sibai has received the Irish Presidential Distinguished Service Award from President Michael D. Higgins at a ceremony held at the presidential residence Āras an Uachtaráin in Dublin on 16th January. Sinéad, who is one of the 13 people living outside of Ireland to receive the award this year was recognised in the category of Irish Community Support, which acknowledged her contribution to the Irish diaspora in the UAE and her role of raising awareness of the UAE in Ireland. The Presidential Distinguished Service Awards were introduced by the Irish government in 2012 and are aimed at recognising the Irish abroad who have given sustained service in areas such as business, education, community, arts and culture, sport, charitable works and peace.

## UPDATE (SCI)

### Shipping Corporation of India Land and Assets Limited is listed on BSE and NSE



Shipping Corporation of India Land and Assets Limited is listed today on BSE Ltd and National Stock Exchange of India Ltd, enabling trading of shares, creating wealth & investment opportunities for our esteemed shareholders. The listing ceremony was organized at BSE Ltd and was graced by Shri T. K. Ramachandran, IAS, Secretary, MoPSW, Shri Rajesh Kumar Sinha, IAS, Additional Secretary, MoPSW, Capt. B. K. Tyagi, CMD, SCILAL, Shri Atul Ubale, Director (Finance), SCILAL, Shri Manjit Singh Saini, Director (P&A), SCILAL, Shri Prankur Gupta, Director (DIPAM), Ms. Kamala K, CRO (BSE Ltd), Board Members of SCI, senior officials of SCI, SCILAL and other stakeholders. Shares of company are listed at opening price of Rs 46.80 and Rs. 46.70 per share at BSE Limited and National Stock Exchange of India Limited respectively. Debt free company with cash and cash equivalent of more than Rs.1000 crores, the net worth of the Company stands at Rs 3216 crores as on 31.12.2023 and book value of real estate properties of approx Rs 2388 crores as on 31.12.2023 which reflects on the strong financial health of this Company. The legal transfer of assets of the company from SCI to SCILAL is fast moving and expected to be completed in right direction.

## UPDATE (WR)

### WR RPF apprehends culprits involved in crimes at railway premises under operation yatri suraksha

According to a press release issued by Shri Sumit Thakur – Chief Public Relations Officer of Western Railway, RPF has made a special effort to contain the menace of theft of passenger belongings. Giving impetus to Operation Yatri Suraksha, Western Railway has installed 3912 CCTV cameras including 488 cameras with an inbuilt Facial Recognition System (FRS) which contains details of criminals along with their photos which are uploaded in the system to curb crimes against passengers. In the months of January & February 2024, WR's RPF has apprehended 121 accused of crime against passengers with the help of CCTV cameras and recovered property approx. valued at Rs. 44 lakhs. Citing some recent cases, Shri Thakur informed that recently the Crime Prevention and Detection Squad (CPDS) team of Andheri Post recently nabbed a thief at Andheri station by monitoring through CCTV footages & apprehended him. During interrogation, the suspect Vinod Prem Chand Gupta, aged 38 years disclosed his involvement in four different mobile theft cases. The theft incidents had occurred on different dates at Andheri station. After legal formalities, the accused was handed over to GRP/Andheri for further legal action. The accused had stolen mobiles worth approx. Rs.90,000. Four theft cases have been lodged against him under section 379 of the Indian Penal Code.

## UPDATE (SVKM)

### SVKM's Dr. Bhanuben Nanavati College of Pharmacy accredited with "A++" Grade by NAAC"

"SVKM's Dr. Bhanuben Nanavati College of Pharmacy (BNCP) has achieved an extraordinary milestone, securing an 'A++ Grade' with an exceptional 3.64 CGPA on a 4 Point Scale in the 1st Cycle of National Assessment & Accreditation Council (NAAC). This accolade highlights BNCP's commitment to excellence in pharmaceutical education. In addition to this remarkable achievement, BNCP maintains accreditation from the National Board of Accreditation (NBA) for another six-year period spanning the from 2024 to 2029 . Furthermore, BNCP has been recognized as the 38th ranked pharmacy college in India by NIRF, MHRD, Government of India, for the year 2023. The institute's vision, "To be recognized as a top institute of pharmaceutical sciences in the country which develops professionally competent and socially sensitive individuals who cater to the needs of higher pharmacy education, research and industry," drives its educational programs.




## UPDATE (SBI)

### Run for a greener planet, the "SBI Green Marathon" is back

State Bank of India, the country's largest bank is back with its flagship event the 'SBI Green Marathon'. With its unwavering commitment to raising awareness for sustainable practices, the bank organizes the marathon where participants run to create awareness about and make efforts toward sustainable practices. The marathon saw participation from more than 5000 volunteers. The marathon was flagged off by the Sh. C S Setty, MD and Sh. Binod Kumar Mishra, DMD (HR) & CDO on Sunday morning at Bandra Kurla Complex. This is the fourth edition of the SBI marathon. This edition is the first of many post- COVID-19 pandemic. Before the pandemic, the bank conducted these marathons to raise awareness about the discrepancies causing the ecosystem to degrade due to human practices. The marathon was held for the 3 categories i.e. 21 KM, 10 KM & 5 KM.

---

## TCPL PACKAGING LIMITED

**CIN:- L22210MH1987PLC044505**
**Registered Office:-** Empire Mills Complex, 414, Senapati Bapat Marg, Lower Parel, Mumbai 400 013 **Tele:-** +91 22 61646000
**Fax:-** +91 22 24935893 | **Email:-** info@tcpl.in | **Website:-** www.tcpl.in

**POSTAL BALLOT NOTICE AND REMOTE E-VOTING INFORMATION**

Members are hereby informed that pursuant to section 108, 110 and other applicable provisions, if any of the Companies Act 2013 read with Rule 20 and 22 of the Companies (Management and Administration) Rules 2014 including any statutory modification(s) and / or re-enactments thereof for the time being in force, guidelines prescribed by Ministry of Corporate Affairs (the MCA), vide General Circular No. 11/2022 dated 28th December 2022 and other relevant circulars issued by MCA from time to time, Regulation 44 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulation 2015 and any other applicable laws and regulations, the Company has completed dispatch of Postal Ballot Notice on **Tuesday 26th March 2024** through electronic mode only to those members whose e-mail addresses are registered with the Company / Depositories and whose names are recorded in the Register of members of the Company or Register of Beneficial owner maintained by Depositories as on **Friday, 22nd March 2024,** seeking approval of shareholders of the Company by Postal Ballot through electronic means, for the following matter:

| Type of Resolution | Resolution |
|---|---|
| Special | Re-appointment of Mrs. Deepa Harris (DIN:-00064912), as an Independent Director of the Company to hold the office for second term of five consecutive years commencing from 1st April 2024 to 31st March 2029. |
| | Appointment of Mr. Ashish Razdan (DIN:- 03584734), as an Independent Director of the Company to hold the office for a term of five consecutive years commencing from 21st March 2024 to 20th March 2029. |

The Company has engaged services of National Securities Depository Limited ("NSDL") for providing remote e-voting facility to its member. The detailed procedure for remote e-voting is listed as a part of the Postal Ballot Notice.

**Remote e voting Schedule**

| | |
|---|---|
| Cut-off date for eligibility of remote e-voting | Friday, 22nd March 2024 |
| Commencement of e-voting period | 9.00 a.m. IST on Wednesday 27th March 2024 |
| Conclusion of remote e-voting period | 5.00 p.m. IST on Thursday 25th April 2024 |

Please note that the communication of assent or dissent of the members would only take place through the remote e-voting system. The voting rights of the members shall be in proportion to the shares held by them in the paid-up equity share capital of the Company as on cut-off date.

A person who is not a member as on cut-off date should treat this Notice for information purpose only. Once the vote on a resolution is cast, members shall not be allowed to change it subsequently.

The remote e-voting shall not be allowed beyond 5:00 p.m. (IST) on Thursday, 25th April 2024 and the remote e-voting module shall be disabled by NSDL thereafter.

The Board of Directors of the Company has appointed Mr. Vijay Mishra, Practicing Company Secretary, as the Scrutinizer for conducting the Postal ballot / e-voting process in a fair and transparent manner.

The Postal Ballot Notice is available on the website of the Company ww.tcpl.in on website of NSDL at www.evoting.nsdl.com and website of stock exchanges where the equity shares of the Company are listed, BSE Limited at www.bseindia.com and National Stock Exchange of India Limited at www.nseindia.com

Shareholders holding shares in electronic form and who have not updated their email or KYC details are requested to register/update the details in their demat account as per the process advised by their respective Depository Participant. Shareholder, holding shares in physical form who have not updated their email or KYC details are requested to register/update the said details in the prescribed Form ISR-1 with Registrar and Share Transfer Agent of the Company, Link Intime India Private Limited. The Shareholders can access the relevant forms on the Company's website at www.tcpl.in

For details relating to remote e-voting, please refer to Postal Ballot Notice. In case of any queries relating to voting by electronic means, shareholders may refer the Frequently Asked Questions (FAQs) for shareholders and e-voting user manual for shareholders available at download section of www.evotingnsdl.com. Or call at nos. 022-4886 7000 or 022-2499 7000 or send a request to Mr. Amit Vishal, Asst Vice President, NSDL or Ms. Pallavi Mhatre, Senior Manager, NSDL at evoting@nsdl.co.in or at NSDL, Trade World, A Wing, 4th Floor, Kamala Mils compound, Lower Parel, Mumbai 400 013

The Scrutinizer will submit his report to the Chairman, or any person authorized by the Chairman after the completion of scrutiny of the e-voting, and the result will be announced on or **before 5.00 p.m.** (IST) on **Friday 26th April 2024** on the stock exchanges where the Company's shares are listed. The result will also be displayed at website www.tcpl.in and on website of NSDL at www.evoting.nsdl.com

For **TCPL Packaging Limited**
**S G Nanavati**
Executive Director
DIN:- 00023526

Date:- 26th March 2024
Place:- Mumbai

---

## NOTICE
## [TATA MOTORS LIMITED]

**Registered Office :** [Bombay House, 24 Homi Mody Street, Mumbai, Maharashtra-400 001]

**NOTICE** is hereby given that the certificate(s) for the undermentioned securities of the Company has/ have been lost/ mislaid and the holder(s) of the said securities/ applicant(s) has/ have applied to the Company to release the new certificate. The company has informed the holders/ applicants that the said shares have been transferred to IEPF as per IEPF Rules. Any person who has a claim in respect of the said securities should lodge such claim with the Company at its Registered Office within 15 days from this date, else the Company will proceed to release the new certificate to the holders/ applicants, without further intimation.

| Name(s) of holder(s) [and jt. holder(s), if any] | Kind of Securities and face value | No. of Securities | Distinctive number(s) |
|---|---|---|---|
| DNYANESHWER WAKADE AND SHIRISH WAKADE | TATA MOTORS LIMITED Face Value RE 2/- | 630<br>630 | 27268826 TO 27269455<br>27270146 TO 27270775 |

PUNE (Place) 26TH MARCH 2024 (Date)
DNYANESHWER WAKADE AND SHIRISH WAKADE [Name(s) of holder(s)/Applicant(s)]

---

**BAYER CROPSCIENCE LIMITED**
**CIN:** L24210MH1958PLC011173
**Regd. Office:** Bayer House, Central Avenue, Hiranandani Estate, Thane (West) - 400607.
**Tel. No.:** 022-2531 1234, **Email:** ir_bcsl@bayer.com
**Website:** www.bayer.in

**DECLARATION OF THE RESULTS OF POSTAL BALLOT**

Pursuant to Section 108 and Section 110 of the Companies Act, 2013 (the 'Act') read with Rule 20 and Rule 22 of Companies (Management and Administration) Rules, 2014, approval of members of the Company was sought through Postal Ballot vide the Postal Ballot Notice dated February 01, 2024, for the below mentioned resolution:

| Sl. No. | Particulars | Resolution |
|---|---|---|
| 1. | Appointment of Dr. Miriam Holstein (DIN: 10458293) as Non-Executive Non-Independent Director of the Company | Ordinary |

Based on the Scrutinizer's Report dated March 26, 2024, the results of Postal Ballot, as declared, were as under:

| Particulars | % |
|---|---|
| Votes in the favour of the resolution set out at Sl. No. 1 | 99.72 |
| Votes against the resolution set out at Sl. No. 1 | 0.28 |

Accordingly, the resolutions as set out in the Postal Ballot Notice were passed by the Members with majority votes cast in favour of the resolutions.

For **Bayer CropScience Limited**
Sd/-
**Nikunjkumar Savaliya**
Company Secretary & Compliance Officer
(Membership Number: FCS 7048)

Place : Thane
Date : March 27, 2024

---

## CLASSIFIEDS
### PERSONAL
### CHANGE OF NAME

I VANDANA SINGH D/O SANTRAJ SINGH W/O ROHIT ASHOK SINGH R/O Sai Janseva Samiti Midc-C Cross-Road Rebello-Compound Subhash-Nagar No-2 Andheri East-Mumbai Mahrashtra- 400093 have changed my name to VANDANA ROHIT SINGH.
0040721576-5

I SATPREET ARORA D/O MANJIT SINGH ARORA W/O JOSEPH LUCIUS R/O Near LBS-Marg B-601 Mayfair Symphony Park-Site Vikhroli West-Mumbai Maharashtra-400079 have changed my name to POORNIMA LUCIUS.
0040721576-2

I BISMAN KAUR SETHI D/O RAVINDER SINGH SETHI R/O Building-No.8 Flat-No.1 Old-Nagaradas Road Varma Nagar Andheri East-Mumbai Maharashtra-400069 have changed my name to BISMAN KOUR SETHI.
0040721576-3

I RAJNIKANT PATEL alias PATEL RAJNIKANT FAKIRBHAI S/O FAKIRBHAI PATEL R/O 47/1903 Evershine Halley Tower Thakur Mumbai Maharashtra-400101 have changed my name to RAJNICKANT PATEL.
0040721576-1

I SAILI RAMDAS HANDE D/O RAMDAS HANDE W/O CHETAN NAMDEO KUTE R/O A-202 Shivam-Apartment Plot-No.5A Sector-6 Navi-Mumbai Ghansoli Thane Maharashtra - 400701 have changed my name to SAILI CHETAN KUTE.
0040721576-4

"IMPORTANT"
Whilst care is taken prior to acceptance of advertising copy, it is not possible to verify its contents. The Indian Express (P) Limited cannot be held responsible for such contents, nor for any loss or damage incurred as a result of transactions with companies, associations or individuals advertising in its newspapers or Publications. We therefore recommend that readers make necessary inquiries before sending any monies or entering into any agreements with advertisers or otherwise acting on an advertisement in any manner whatsoever.

---

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that the following Share Certificates for 30 Equity shares of Face Value Rs. 10/- (Rupees Ten only) each with Folio No. **074845100** of Reliance Industries Limited, having its registered office at Maker Chambers IV, 3rd Floor, 222 Nariman Point, Mumbai, Maharashtra - 400021 registered in the name of **ARMAITY ROHINTON KHAMBATA / BANOO BEHRAM DADACHANJI / BEHRAM NERWANJI DADACHANJI** / have been lost. **ARMAITY ROHINTON KHAMBATA** have applied to the company for issue duplicate certificate. Any person who has any claim in respect of the said shares certificate should lodge such claim with the company within 15 days of the publication of this notice.

| Folio No. | No. of Shares | Certificate No. | Distinctive Nos. (From-To) |
|---|---|---|---|
| 074845100 | 25 | 16664123 | 466905955-466905979 |
| 074845100 | 5 | 16664124 | 466905980-466905984 |

**Place:** Mumbai
**Date:** 27th March 2024
Sd/-
**ARMAITY ROHINTON KHAMBATA**

---

**E-AUCTION SALE NOTICE**
**FOR SALE OF RNP MARKETING AND CARGO PRIVATE LIMITED**
**(In Liquidation) (CIN: U01100MH2008PTC187995)**
**Room No. F-203, Nandanvan Apts., Dahanukar Wadi, New Link Road, Opp. Lalji Pada Police Station, Kandivali West, Mumbai -400067, Maharashtra, India.**
**(Sale under Insolvency and Bankruptcy Code, 2016)**

Notice is hereby given to public in general that the undersigned Liquidator of RNP Marketing and Cargo Private Limited **(RNP/Corporate Debtor)**, in Liquidation, appointed by the Hon'ble National Company Law Tribunal, Mumbai, Court-I **(Adjudicating Authority/NCLT)** vide order dated 11.10.2023 **(Liquidation Order)** intends to sell the Corporate Debtor –

(A) by way of Sale of assets –Immovable Property of the Corporate Debtor forming part of the liquidation estate of Corporate Debtor; and/or

under the Insolvency and Bankruptcy Board of India (Liquidation Process) Regulations, 2016 **(Liquidation Regulations)**, through e-auction on **"as is where is basis", "as is what is basis", "whatever there is basis" and "without recourse basis".** The details regarding the Corporate Debtor are available on https://eauctions.co.in Email ID: admin@eauctions.co.in Mobile No. +91 9870099713

| | |
|---|---|
| Auction Date and time | **26-04-2024**<br>**For Block A** - 10:00AM to 12:00 PM with unlimited extension of 5 minutes each.<br>**sale of assets in parcels** |
| Last date for submission of Tender Documents/bid | **10-04-2024** |
| Last date of declaration of Qualified Bidder | **15-04-2024** |
| Last date of information sharing and site visit | **22-04-2024** |
| Last date for submission of Earnest Money Deposit (EMD) | **24-04-2024** |

The reserve price and earnest money deposit will be as mentioned in the table below:

| Block no. | Description of Assets | Reserve Price | EMD | Bid Incremental Value |
|---|---|---|---|---|
| A | Sale of assets in Parcels – Immovable Property, as per Regulation 32(d) of the IBBI Liquidation Process Regulation 2016. - | | | |
| | Non-Agricultural Land Survey No. 9,11,30/2 and 32/02 at Village Shirsatwadi, Near MNS Office, Taluka Shirala, District Sangli -415405, Total Area in Sq. Mtrs. 91960 | 2,25,00,000 | 10% | 5,00,000 |

Please note that the e-Auctions would be conducted on **26-04-2024** for RNP Marketing and Cargo Private Limited (In Liquidation). **Option A** the auction for sale of Immovable Property of the Corporate Debtor.

Sale will be done by the undersigned through e-Auction service provider i.e., Linkstar Infosys Private Limited. The sale shall be subject to the terms and conditions prescribed in the Process Memorandum available on https://eauctions.co.in and the following conditions:

1. The particulars of the Corporate Debtor specified in the table above have been stated as per best knowledge.
2. Information available with the Liquidator on bona fide basis. It is clarified that the Liquidator makes no representation regarding the accuracy of the status of the details.
3. The prospective bidders are also advised to make their own independent inquiries regarding the Corporate Debtor.
4. The liabilities of the Corporate Debtor shall be settled in accordance with Section 53 of the Insolvency and Bankruptcy Code, 2016.
5. If any offer is received within the last 5 (five) minutes of closure time, the bidding time will be extended automatically by another 5 (five) minutes, the auction will automatically get closed at the extended 5 (five) minutes.

**Jitender Kothari**
**Liquidator of RNP Marketing and Cargo Private Limited**
(Appointed as per the Hon'ble NCLT Mumbai Bench -I, Order dated 11th October 2023, Copy of Order made available on 18th October 2023)
IBBI/IPA-001/IP-P00540/2017-2018/10965
AFA: AA1/10965/02/040924/105985 valid upto 04/09/2024
Reg. Address with IBBI: 702, Orchid A Wing, Evershine Park CHS, Off Veera Desai Road, Andheri West, Mumbai - 400053, Maharashtra
Reg. Email ID with IBBI: jitenderkothari@rediffmail.com
Project Specific Email ID for Correspondence: liquidator.rnp@gmail.com
Date: 27th March 2024
Place: Mumbai

# आरंभ है प्रचंड! साताऱ्यात उदयनराजेंच्या पोस्टर्सची चर्चा

## उमेदवारीसाठी ग्रीन सिग्नल

■ सातारा

**खासदार** उदयनराजे भोसले यांनी दिल्लीत अमित शहा यांची भेट घेतली. यानंतर उदयनराजे यांची सातारा लोकसभेतून उमेदवारी जवळपास निश्चित झाल्याचे सांगितले जात आहे. उदयनराजे यांच्या कार्यकर्त्यांनी साताऱ्यात त्यांच्या भव्य स्वागत सोहळ्याचे आयोजन केले आहे. यासाठी साताऱ्यात ठिकठिकाणी उदयनराजेंचे पोस्टर्स लावण्यात आली आहेत. या पोस्टर्सची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे.

आरंभ है प्रचंड! असे लिहीत पोस्टरवर उदयनराजे यांचा फोटो लावण्यात आला आहे. तसेच भाजपाचे कमळ चिन्हही पोस्टरवर आहे. उदयनराजेंना अद्यापी पक्षाकडून उमेदवारी जाहीर करण्यात आलेली नाही. मात्र तरीही साताऱ्यात उदयनराजेंच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू आहे. दोन दिवसांपूर्वी गृहमंत्री अमित शहा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उदयनराजे यांच्यात दिल्ली येथे बैठक पार पडली. या बैठकीत उदयनराजेंना उमेदवारीसाठी ग्रीन सिग्नल मिळाल्याचे सांगितले जात आहे. या बैठकीनंतर उदयनराजे पहिल्यांदाच सातारा जिल्ह्यात येत आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून उदयनराजेंचा भव्य स्वागत सोहळा आयोजित केला आहे. उद्या दुपारी तीन वाजता सातारा जिल्ह्याची बॉर्डर असणाऱ्या नीरा नदी पूल शिरवळ येथून या स्वागत सोहळ्याला सुरुवात होईल. शिरवळ ते सातारा येथे उदयनराजेंचे निवासस्थान जलमंदिरपर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी भव्य सत्कार आणि स्वागत सोहळा कार्यकर्त्यांनी आयोजित केला आहे. या स्वागत सोहळ्यासाठी हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.




# गुढीपाडव्याच्या 'आनंदाचा शिधा'ला आचारसंहितेचा अडथळा

■ मुंबई

**शहरातील** सरकारमान्य रेशन दुकानातून कार्डधारकांना गुढीपाडव्याच्या सणा-निमित्त दिले जाणारे 'आनंदाचा शिधा'चे किट लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे हे किट कार्डधारकांच्या पदरात पडणार नाही, अशी माहिती २३ ड शिधावाटप कार्यालयातून देण्यात आली.

राज्य शासनाने गेल्या दोन वर्षांपासून केशरी रंगाचे व अंत्योदय रेशन कार्डधारकांना छत्रपती शिव जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, दिवाळी व गुढीपाडवा यानिमित्त रेशन दुकानांतून 'आनंदाचा शिधा' किट शंभर रुपयात देण्यास सुरुवात केली आहे. या किटमध्ये साखर, चनाडाळ, गोडेतेल, रवा, मैदा, पोहे असे जिन्नस असते.

९ एप्रिल रोजी गुढीपाडवा सण आहे. याच दरम्यान आचारसंहिता आहे. आनंदाचा शिधा या किटच्या पिशव्यांवर पंतप्रधान व राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यांची छायाचित्रे असल्याने किटचे वाटप केले जाणार नाही. किंबहुना ही योजना आचारसंहिता लागू असल्याने राबविता येणार नाही, असे २३ ड शिधावाटप कार्यालयातून स्पष्ट करण्यात आले.



# आमचे जागावाटप दिल्लीत नाही, तर मातोश्रीवर! राऊतांचा हल्लाबोल

■ मुंबई

**जागावाटपासाठी** अनेक नेत्यांना दिल्लीवारी करावी लागते. पण आम्हाला दिल्लीत जाऊन गुलामी करावी लागत नाही. कारण आमचे जागावाटप महाराष्ट्रातच आणि मातोश्रीवर होते, असे म्हणत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी दिल्लीवारी करणाऱ्या नेत्यांवर टीका केली. वंचितला आम्ही दिलेला चार जागांचा प्रस्ताव कायम आहे. जागावाटपाबाबत प्रकाश आंबेडकरांसोबत संवाद सुरू आहे. वंचित मविआचा महत्त्वाचा घटक आहे. हुकुमशाही विरुद्ध आणि संविधान रक्षणासाठी आंबेडकर आमच्यासोबत ठामपणे उभे राहतील याची आम्हाला खात्री आहे, असेही राऊत यांनी सांगितले.

राऊत म्हणाले की, मातोश्रीवर काल शरद पवार, जयंत पाटील, उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत पुढील रणनीतीबाबत चर्चा करण्यात आली. तीन पक्षांच्या एकत्र सभा, प्रचार यंत्रणा याबाबत सकारात्मक चर्चा झाली. नाशिकच्या जागेवर मंत्री छगन भुजबळ यांनी दावा केल्याच्या चर्चा आहेत. जागेसाठी तयारी सर्वच करतात, पण त्यासाठी जागाही मिळाली पाहिजे. अजित पवार यांच्या हातात ती जागा नाही. कदाचित शरद पवारांनी जागा दिली असती. मात्र आता अजित पवार आणि भुजबळ यांचे दिल्लीतील गुजराती नेते याबाबत निर्णय घेतील. स्वतःचा निर्णय घेण्यासाठी लागणारी हिंमत आणि अधिकार त्यांच्यात नाही. एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या हातात काहीच नाही. महाराष्ट्रात पूर्वी मातोश्रीवरच जागावाटपाच्या बैठका होत होत्या. तिथेच निर्णय घेतले जात होते.

### ठाकरे गटाची यादी आज जाहीर होणार

महाविकास आघाडीतील ठाकरे गटाची यादी उद्या जाहीर होणार आहे. उद्या महाविकास आघाडीतील पवार गट व काँग्रेसचेही काही उमेदवार जाहीर होतील असे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सांगितले. महाविकास आघाडीत गेल्या अनेक दिवसांपासून जागा वाटपावरून जोर बैठका सुरू होत्या. पण प्रकाश आंबेडकर यांच्यामुळे मविआच्या जागा वाटपाचा तिढा सुटत नव्हता. पण आता हा तिढा सुटला असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे ठाकरे गटाची यादी उद्या जाहीर होईल.

# कंगनाच्या उमेदवारीवरून भाजपामध्येच खदखद

■ मंडी

**हिमाचल** प्रदेशातील मंडी लोकसभा मतदारसंघातून भाजपाने कंगना रानौत यांना उमेदवारी दिल्यावर आता भाजपाचे माजी खासदार महेश्वर सिंह यांनी मनातील खदखद व्यक्त केली आहे.



महेश्वर सिंह म्हणाले की, वरिष्ठांनी मंडीमधून कंगनाला उमेदवारी दिली आहे त्याबद्दल कंगनाचे अभिनंदन. भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वात मोठे विद्वान, बुद्धीमान व अनुभवी लोक आहेत. सगळा विचार करूनच कंगनाला उमेदवारी दिली आहे. त्यासाठी विशेष सर्व्हे सुद्धा केला आहे. त्यात कंगना आमच्यापेक्षा पुढे असू शकते. सिद्धांताच्या राजकारणाची विचारधारा बदलली आहे.

महेश्वर सिंह मंडीतून ३ वेळा लोकसभा सदस्य होते, तर ते १ वेळा राज्यसभा सदस्यही होते. आत्ताही मंडीतून ते इच्छुक असून, त्यांना तिकीट मिळाले नाही. पक्षाच्या कुटुंबाचा विस्तार झाला आहे. त्यामुळे सर्व्हेत योग्य वाटते त्यालाच उमेदवारी दिली जाते, आमचे काही म्हणणे नाही.

आम्ही कोणत्याही गोष्टीला विरोध करणार नाही. पक्ष म्हणाला तर प्रचार करू, पाठिंबा देऊ. पण कदाचित पक्षाला आता आमच्या पाठिंब्याचीही गरज नाही, या शब्दांत त्यांनी आपली भावना व्यक्त केली.

# ठाणे जिल्हा रुग्णालयात नवीन वातानुकूलित यंत्रणा

■ ठाणे

**ऐन** उन्हाळ्यात आता ठाण्यातील सिव्हिल हॉस्पिटल म्हणजेच जिल्हा रुग्णालयात रुग्णांना थंडगार हवा मिळणार आहे. कारण १५० खाटांच्या बंदिस्त तंबूमध्ये नवीन वातानुकूलित यंत्रणा कार्यान्वित करण्यात येत आहे.

या सिव्हील रुग्णालयाच्या भव्य इमारतीचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे. त्यासाठी तब्बल नऊ महिन्यांपूर्वी सिव्हिल रुग्णालय पाडून या जागेत सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे बांधकाम सुरू आहे. पण रुग्णांच्या सेवेत खंड पडू नये, रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून वागळे इस्टेट मनोरुग्णालय शेजारी आरोग्य विभागाच्या जागेत तात्पुरत्या स्वरूपाचे सिव्हिल रुग्णालय सुरू केले आहे. रुग्णांना चांगले उपचार देण्याचा प्रयत्न आरोग्य विभागाचा असून दरदिवशी सुमारे ५०० ते ६०० रुग्ण उपचारासाठी येत असतात. रुग्णालयात ३४६ खाटा असून, यापैकी सुमारे १५० खाटा या टेंट म्हणजेच तंबूमध्ये आहेत. आता उष्मा वाढल्याने टेंटमधील वातावरण तापत आहे. त्यावर मात करण्यासाठी रुग्णांच्या सोयीसाठी टेंट वातानुकूलित यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. या सिव्हिल रुग्णालयात टेंट मध्ये कुलर फॅन आणि वातानुकूलित यंत्र बसवले जाणार आहेत. टेंटच्या तीन भागांत जनरल, औषधे, महिला, ओर्थो इत्यादी विभागासाठी खाटा आहेत.

# पोलीस भरतीच्या विद्यार्थ्यांचा अधीक्षक कार्यालयावर मोर्चा

■ छत्रपती संभाजीनगर

**पोलीस** भरतीची तयारी करत असलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या काही मागण्यांसाठी आज मंगळवारी छत्रपती संभाजीनगरच्या पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आवारात ठिय्या मांडून पोलीस अधीक्षकांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले.



राज्य शासनाने पोलीस भरती संदर्भात मार्च २०२३ च्या वयवाढीसंदर्भात काढलेल्या जीआरची वैधता मार्च २०२४ पर्यंत वाढवावी. तसेच एसईबीसी जात प्रमाणपत्र शासन दरबारी मिळण्यास अडचणी येत असल्याने महाराष्ट्र शासनाने जारी केलेली पोलीस भरती प्रक्रिया एमपीएससी परीक्षेप्रमाणे पुढे ढकलण्यात यावी, या मागणीसाठी मोर्चा काढत या मागण्यांचे निवेदन आज विद्यार्थ्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात सादर केले. मराठा समाजातील काही मुलांनी वयोमर्यादा ओलांडली आहे, तर काही मुलांना कागदपत्रे काढण्यास तांत्रिक अडचणी येत असल्याने विलंब होत आहे. त्यासाठी हे विद्यार्थी आज पोलीस अधीक्षक कार्यालयात एकत्र जमले होते. मोर्चा काढत त्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आवारात ठिय्या आंदोलन केले.

# तमलूकमध्ये गंगोपाध्याय यांच्याविरुद्ध 'खेला होबे'चे गीतकार भट्टाचार्य

■ कोलकाता

**कोलकाता** न्यायालयाचे माजी न्यायाधीश व भाजपाचे तमलूकचे उमेदवार अभिजित गंगोपाध्याय यांच्या विरोधात तृणमूल काँग्रेसने २०२१ च्या विधानसभा निवडणुकांचे 'खेला होबे' हे प्रचारगीत लिहिणाऱ्या देवांशू भट्टाचार्य यांना उमेदवारी दिल्याने या मतदारसंघात चुरस निर्माण झाली आहे.

न्यायाधीशपदी असताना गंगोपाध्याय यांनी बंगाल सरकारच्या काही महत्त्वाच्या निर्णयांना स्थगिती दिली होती. तसेच काही प्रकरणांच्या चौकशीचे आदेशही दिले होते. त्यांनी २०२१ मध्ये ममता सरकारमधील कथित शिक्षक भरती घोटाळ्याची सीबीआयमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्यात ममता यांच्या निकटवर्ती तत्कालीन शिक्षण राज्यमंत्री प्रार्था चॅटर्जी यांचाही समावेश होता. त्यावेळी ही भरती प्रक्रिया स्थगित करावी लागली होती. गंगोपाध्याय यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर काही दिवसांतच त्यांना निवडणुकीचे तिकीट देण्यात आल्याने भाजपाने ही जागा प्रतिष्ठेची केल्याचे दिसत आहे. तर तृणमूल काँग्रेसने सोशल मीडिया टीमचे प्रमुख आणि 'खेला होबे' या प्रचार गीताचे लेखक देवांशू भट्टाचार्य यांना उतरवले आहे. यामुळे ६१ वर्षीय माजी न्यायाधीश गंगोपाध्याय यांना भट्टाचार्य या युवा लेखकाशी टक्कर द्यावी लागणार आहे.

टीएमसीने विद्यार्थ्यांच्या भावनांना हात घालत तरुण चेहऱ्याला संधी दिल्याने ही लढत तृणमूलनेही प्रतिष्ठेची केल्याचे दिसत आहे.


**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that the following Share Certificates for 30 Equity shares of Face Value Rs. 10/- (Rupees Ten only) each with Folio No. **074845100** of Reliance Industries Limited, having its registered office at Maker Chambers IV, 3rd Floor, 222 Nariman Point, Mumbai, Maharashtra - 400021 registered in the name of **ARMAITY ROHINTON KHAMBATA / BANOO BEHRAM DADACHANJI / BEHRAM NERWANJI DADACHANJI** / have been lost. **ARMAITY ROHINTON KHAMBATA** have applied to the company for issue duplicate certificate. Any person who has any claim in respect of the said shares certificate should lodge such claim with the company within 15 days of the publication of this notice.

| Folio No. | No. of Shares | Certificate No. | Distinctive Nos. (From-To) |
|---|---|---|---|
| 074845100 | 25 | 16664123 | 466905955-466905979 |
| 074845100 | 5 | 16664124 | 466905980-466905984 |

**Place:** Mumbai
**Date:** 27th March 2024
Sd/-
**ARMAITY ROHINTON KHAMBATA**


# ठाकरे गटाचे अनिल देसाईंच्या सहाय्यकाला ईडीचे समन्स



■ मुंबई

**बेहिशेबी** मालमत्ता प्रकरणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते अनिल देसाई यांचे निकटवर्तीय दिनेश बोभाटे यांना अंमलबजावणी संचलनालयाने (ईडी) समन्स बजावले आहे. या आठवड्यात त्यांना चौकशीसाठी ईडीच्या कार्यालयात हजर राहावे लागणार आहे.

दिनेश बोभाटे यांच्याविरुद्ध केंद्रीय गुन्हे अन्वेषण शाखेने (सीबीआय) बेहिशोबी मालमत्ता बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. त्या अनुषंगाने ईडीने तपास हाती घेतला असून, बोभाटे यांना चौकशीसाठी बोलावले आहे. लोकसभा निवडणूक तोंडावर आली असताना बोभाटे यांना ईडीने समन्स बजावल्याने अनिल देसाईंच्या अडचणीत वाढ झाल्याचे बोलले जात आहे.

सीबीआयने बोभाटे यांच्याविरुद्ध उत्पन्नाच्या ज्ञात स्त्रोतांहून कितीतरी जास्त मालमत्ता गोळा केल्याचा आरोप केला आहे. २ कोटी ३८ लाख रुपयांची मालमत्ता बोभाटे यांच्या नावे असून, त्यांच्या उत्पन्नाच्या ज्ञात स्त्रोतांच्या तुलनेने ही मालमत्ता ३६.४३ टक्के जास्त आहे, असा सीबीआयचा दावा आहे. त्याची दखल घेत ईडीने बोभाटे यांच्याविरूध्द मनीलॉंड्रिंगचा गुन्हा दाखल केला आहे. २०१४ ते २०२३ या कालावधीत लोअर परेलमध्ये न्यू इंडिया ॲश्युरन्स कॉर्पोरेशन लिमिटेडमध्ये सहाय्यक आणि वरिष्ठ सहाय्यकपदी काम करीत असताना बोभाटे यांनी गैरमार्गाने ही मालमत्ता कमावली, असा ईडीचा आरोप आहे. बोभाटे यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून ही बेहिशोबी मालमत्ता कमावली. ज्यामध्ये बँकांमधील फिक्स डिपॉझिट, म्युच्युअल फंडांमधील गुंतवणूक तसेच स्थावर मालमत्तांचा समावेश आहे.

# मुखातून श्रीराम म्हणायचे घरात महाभारत चालले आहे

## शर्मिला पवारांची टीका

■ बारामती

**बारामती** लोकसभा मतदारसंघात सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी लढत होणार असल्याचे जवळजवळ स्पष्ट आहे. या लढतीत पवार कुटुंब शरद पवारांच्या म्हणजेच सुप्रिया पवारांच्या बाजूने उभे असल्याचे दिसत आहे. काही दिवसांपूर्वी अजित पवारांचे मोठे बंधू श्रीनिवास पवार यांनी अजित पवारांवर टीका केल्यानंतर आता त्यांच्या पत्नी शर्मिला पवार यांनीही 'मुखातून श्रीराम म्हणायचे आणि घरात महाभारत चालले आहे,' असे वक्तव्य करत अप्रत्यक्षपणे अजित पवारांवर टीका केली.

शर्मिला पवार सुप्रिया सुळे यांच्या प्रचारासाठी फिरत आहेत. या दरम्यान गावकऱ्यांना आवाहन करता शर्मिला पवार म्हणाल्या, 'त्यांना निवडून द्यायचे की नाही द्यायचे हा सर्वस्वी तुमचा अधिकार आहे. मी आता कितीही म्हटले की, इथे आता विहीरी पाडल्या आहेत, म्हणून तुम्ही मतदान करा. तरी तुम्ही करणार नाहीत. कारण तुम्ही जाणते आहात. तुम्हालादेखील माहिती आहे की, आज काय घडते आहे, मुखातून श्रीराम म्हणतो आहे, पण घरामध्ये काय चालू आहे, रामायण चालू आहे की महाभारत चालू आहे.

एका अनोळखी व्यक्तीला मतदान करण्यापेक्षा एक जो आपल्या ओळखीचा उमेदवार आहे, त्याला मतदान करा. तुम्हाला माहिती आहे की, त्या कोण आहेत? त्यांचं काम काय आहे? त्यांचे वडील कोण आहेत? त्या लेकीला आपण पुन्हा एकदा संधी द्यायची आहे. ताईसाहेबांना आपल्याला विजयी करायचे आहे.


**ई-लिलाव विक्री सूचना**
**आरएनपी मार्केटिंग ॲण्ड कार्गो प्रायव्हेट लिमिटेडच्या विक्रीकरिता**
**(परिसमापनाअंतर्गत)** (सीआयएन: U01100MH2008PTC187995)
खोली क्र. एफ-२०३, नंदनवन अपार्ट., डहाणुकर वाडी, न्यू लिंक रोड, लालजी पाडा पोलीस स्टेशन समोर, कांदिवली पश्चिम, मुंबई - ४०००६७ महाराष्ट्र, भारत.
(नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अंतर्गत विक्री)

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई, न्यायालय -I **(निर्णय देणारे प्राधिकरण/एनसीएलटी)** यांच्याद्वारे दिनांक ११.१०.२०२३ रोजीच्या आदेशानुसार **(परिसमापन आदेश)** नियुक्त केलेले आरएनपी मार्केटिंग ॲण्ड कार्गो प्रायव्हेट लिमिटेड **(आरएनपी/कॉर्पोरेट धनको)**, परिसमापनामध्ये,चे निम्नस्वाक्षरीकार परिसमापक कॉर्पोरेट धनकोची -

(अ) संपत्तीच्या विक्री मार्गे - कॉर्पोरेट ऋणकोच्या परिसमापन संपत्तीचा भाग बनणाऱ्या कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थावर मालमत्तेची विक्री; आणि/किंवा

भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ **(परिसमापन विनियमन)** अन्वये, ई-लिलावाद्वारे **"जसे आहे जेथे आहे तत्त्वावर", "जसे आहे जे आहे तत्त्वावर", "तेथे जे आहे तत्त्वावर"** आणि **"कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** विक्री करण्यास इच्छुक आहेत. कॉर्पोरेट ऋणकोशी संबंधित तपशिल https://eauctions.co.in ईमेल आयडी: admin@eauctions.co.in मोबाईल क्र. +९१ ९८७००९९७१३ येथे उपलब्ध आहेत.

| | |
|---|---|
| लिलाव दिनांक आणि वेळ | **दि. २६.०४.२०२४ ब्लॉक अ करिता** - स. १०.०० ते दु. १२.०० पर्यंत ५ मिनिटे प्रत्येकीच्या अमर्यादित विस्तारासह **पार्सल्समध्ये संपत्तीची विक्री** |
| निविदा कागदपत्रे/बोली सादर करण्याकरिता अंतिम दिनांक | **दि. १०.०४.२०२४** |
| पात्र बोलीदारांच्या उद्घोषणेचा अंतिम दिनांक | **दि. १५.०४.२०२४** |
| माहिती सामायिक करण्याचा आणि साईटला भेट देण्याचा अंतिम दिनांक | **दि. २२.०४.२०२४** |
| इसारा रक्कम अनामत (ईएमडी) सादर करण्याकरिता अंतिम दिनांक | **दि. २४.०४.२०२४** |

राखीव किंमत आणि इसारा रक्कम अनामत खालील तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार:

| ब्लॉक क्र. | संपत्तीचे वर्णन | राखीव किंमत | ईएमडी | बोली विस्तार मूल्य |
|---|---|---|---|---|
| अ | पार्सल्समध्ये संपत्तीची विक्री - आयबीबीआय परिसमापन प्रक्रिया विनियमन २०१६ च्या विनियमन ३२(डी) नुसार स्थावर मालमत्ता | | | |
| | गाव शिरसाटवाडी, एमएनएस कार्यालयाजवळ, तालुका शिराळा, जिल्हा सांगली-४१५४०५ येथील अ-कृषिक जमीन सर्व्हे क्र. ९, ११, ३०/२ आणि ३२/०२, एकूण क्षेत्रफळ चौ. मीटर्स मध्ये ९१९६०. | २,२५,००,००० | १०% | ५,००,००० |

कृपया नोंद घ्यावी की, आरएनपी मार्केटिंग ॲण्ड कार्गो प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)करिता ई-लिलाव दि. २६.०४.२०२४ रोजी करण्यात येईल. **पर्याय अ** कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थावर मालमत्तेच्या संपत्तीच्या विक्रीकरिता लिलाव.

सदर विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे ई-लिलाव सेवा प्रदाता म्हणजेच लिंकस्टार इन्फोसिस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मार्फत करण्यात येईल. सदर विक्री https://eauctions.co.in वर उपलब्ध असलेल्या प्रक्रिया मेमोरेंडममध्ये विहीत अटी आणि शर्ती आणि खालील शर्तींच्या अधीन असेल:

१. वरील तक्त्यामध्ये निर्दिष्ट केलेले कॉर्पोरेट ऋणकोचे तपशील सर्वोत्तम ज्ञानानुसार नमूद केलेले आहेत.
२. परिसमापकाकडे उपलब्ध असलेली माहिती बोनाफाईड तत्त्वावर आहे. असे स्पष्ट करण्यात येत आहे की, परिसमापक तपशिलाच्या स्थितीच्या अचुकतेबाबत कोणतीही खात्री देत नाहीत.
३. संभाव्य बोलीदारास असाही सल्ला देण्यात येतो की, त्यांनी कॉर्पोरेट धनकोसंबंधी त्यांची स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी.
४. कॉर्पोरेट धनकोची दायित्वे नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम ५३च्या अनुषंगाने निकाली काढण्यात येतील.
५. समाप्ती वेळेच्या शेवटच्या ५ (पाच) मिनिटांमध्ये जर कोणताही प्रस्ताव प्राप्त झाल्यास, बोलीची वेळ आपोआपच पुढील ५ (पाच) मिनिटांकरिता वाढविली जाईल, लिलाव विस्तारित ५ (पाच) मिनिटांनी आपोआपच बंद होईल.

**जितेंदर कोठारी**
**आरएनपी मार्केटिंग ॲण्ड कार्गो प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक**
(माननीय एनसीएलटी मुंबई खंडपीठ -I च्या आदेश दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ नुसार नियुक्त, आदेशाची प्रत दि. १८ ऑक्टोबर, २०२३ रोजी उपलब्ध करण्यात आली.)
IBBI/IPA-001/IP-P00540/2017-2018/10965
एएफए: AA1/10965/02/040924/105985 दिनांक ०४.०९.२०२४ पर्यंत वैध.
आयबीबीआयकडे नोंद. पत्ता: ७०२, ऑर्चिड ए विंग, एव्हरशाईन पार्क सीएचएस, ऑफ वीरा देसाई रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई - ४०००५३, महाराष्ट्र
आयबीबीआयकडे नोंदणीकृत ईमेल आयडी: jitenderkothari@rediffmail.com
पत्रव्यवहाराकरिता प्रकल्प विशिष्ट ईमेल आयडी: liquidator.rnp@gmail.com
दिनांक: २७ मार्च, २०२४
ठिकाण: मुंबई


# वीजबिलावर नेत्यांचे फोटो नको समाजवादी पक्षाने तक्रार केली

■ कोल्हापूर

**महाराष्ट्र** सरकार आणि महावितरण कंपनीने वीज बिलांवर राजकीय नेत्यांचे फोटो छापून उघडपणे निवडणूक आचारसंहिता भंग केला आहे, अशी तक्रार समाजवादी पार्टी महाराष्ट्रच्या वतीने कार्याध्यक्ष व ऊर्जा कार्यकर्ते प्रताप होगाडे यांनी राज्य आणि केंद्रीय निवडणूक आयोगाकडे केली आहे.

आचारसंहिता लागू झाल्यानंतर राज्यातील अंदाजे २.७५ कोटींहून अधिक वीज ग्राहकांना आचारसंहिता भंग करणारी वीजबिले वितरीत करण्यास सुरुवात केली आहे. या बिलांवर दोन्ही बाजूस राज्य सरकारची 'सुराज्य- एक वर्ष सुराज्याचे' असा मथळा असलेली जाहिरात छापलेली आहे. या जाहिरातीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे फोटो छापले आहेत. तसेच सुराज्याच्या एका वर्षातील समृद्ध महाराष्ट्राचे वर्णन केले आहे. ही जाहिरात हा आचारसंहिताभंगाचा प्रकार आहे.

# नवी मुंबईतून पुढच्यावर्षी पहिले विमान उड्डाण होणार

■ नवी मुंबई

**भारतातील** पहिले ग्रीनफिल्ड विमानतळ नवी मुंबईत उभारले जात आहे. हे काम वेगाने सुरू असून, आतापर्यंत ६३ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे ३१ मार्च २०२५ मध्ये या विमानतळावरून विमानाचे पहिले टेकऑफ म्हणजे उड्डाण होईल, असा दावा सिडकोने केला आहे.

येत्या ऑक्टोबर महिन्यापर्यंत विमानांच्या उड्डाणाची चाचणी घेणे अपेक्षित आहे. नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट अदानी समूहाद्वारे रायगड जिल्ह्यातील पनवेलनजीकच्या १६०० हेक्टर जागेवर हा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारला जात आहे. यात सिडको ही नोडल एजन्सी म्हणून काम पाहत आहे. या प्रकल्पाचा अपेक्षित खर्च १९ हजार ६०० कोटी रुपये इतका आहे. सध्या पहिल्या दोन टप्प्यांच्या कामावर भर दिला जात आहे.

सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल हे यासाठी आग्रही आहेत. त्यामुळेच व्यवस्थापकीय संचालकपदाचा पदभार स्वीकारताच सर्वप्रथम त्यांनी विमानतळ प्रकल्पाच्या कामाची पाहणी केली. हा ग्रीनफिल्ड प्रकल्प ५ टप्प्यांत पूर्ण होणार आहे. पहिल्या दोन टप्प्यांत वर्षाला दोन कोटी प्रवासी क्षमता असणार आहे. पहिल्या टप्प्याचे ६३ टक्के काम पूर्ण झाल्याचे सिडकोने स्पष्ट केले आहे. पाच टप्पे पूर्ण झाल्यावर विमानतळाला चार टर्मिनल आणि दोन धावपट्ट्या असतील. तसेच विमानतळावर उत्तम दर्जाचे रस्ते, रेल्वे, मेट्रो आणि पाणीपुरवठ्याचे नियोजन केले आहे.

# भाईंदरमधील नारायणा शाळेतील शुल्कवाढीविरोधात पालक आक्रमक

■ भाईंदर

**शहराच्या** पश्चिमेला असलेल्या नारायणा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मनमानीपणे शुल्कवाढ करून जबरदस्तीने त्याची वसुली केली जात असल्याने पालकवर्ग आक्रमक झाला आहे. या संतप्त पालकांनी मंगळवारी तर शाळेत घेराव घालून व्यवस्थापनाचा निषेध केला. अखेर आता पालक आणि मुख्याध्यापक यांच्यात याबाबत बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

भाईंदर शहरातील तहसीलदार कार्यालय ते स्मशानभूमी या मार्गावर नारायणा ही इंग्रजी सीबीएसई बोर्डाची शाळा आहे. याच शाळेच्या व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांना मनमानीपणे वाढीव शुल्क आकारले आहे. त्याच्या वसुलीसाठी दबावतंत्रही वापरले जात असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. त्यामुळे पालकांनी घेराव घालून आपला संताप व्यक्त केला.

वाढीव फी पैकी ५० टक्के फी पहिल्याच महिन्यात आगाऊ स्वरूपात भरण्याचे फर्मान शाळा व्यवस्थापनाने काढले आहे. त्यामुळे पालकवर्ग हवालदिल झाला आहे. याबाबत पालकांनी व्यवस्थापन आणि शिक्षण विभाग, पालिका आयुक्त आणि तहसीलदार यांच्याकडे लेखी तक्रारी केल्या आहेत. मात्र कुणीही याची दखल घेतली नसल्याने अखेर पालकांनी घेराव घालून हा आपला संताप व्यक्त केला.

# नव मतदार नोंदणी कार्यक्रम नेते आणि कार्यकर्ते नकोत

■ मुंबई

ठाकूर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना भाजपा उमेदवार पियुष गोयल यांच्या मुलाचे भाषण ऐकण्याची जबरदस्ती केल्याप्रकरणी आरोप झाल्यानंतर नव मतदार नोंदणी संबंधी आयोजित कार्यक्रमात कोणताही राजकीय नेता वा कार्यकर्ता यांना आमंत्रित करू नये, असा स्पष्ट आदेश देणारे परिपत्रक विद्यापीठाने आज सर्व कॉलेजना धाडले आहे.